पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक १०/०८/२०२०

## ⇨ दोन जहाल नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

- *गेल्या दोन वर्षात ४ डिव्हीसींसह ३५ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण.*
- *शासनाने एकुण ९ लाख रुपयांचे बक्षीस केले होते जाहिर.*

शासनाने जाहीर केलेली आत्मसमर्पण योजना, वर्षभरात विविध चकमकीत माओवाद्यांचा झालेला खात्मा तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळुन वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक जहाल माओवाद्यांनी आजपर्यंत आत्मसमर्पण केलेले आहे. त्याचबरोबर आत्मसमर्पित माओवाद्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवुन आणल्यामुळे माओवादी मोठया संख्येने आत्मसमर्पण करीत आहेत. नुकतेच एकुण ९ लाख रुपये बक्षीस असलेल्या एकुण ०२ जहाल नक्षलवादयांनी मा. पोलीस उप महानिरीक्षक श्री. महादेव तांबडे सो. व मा. पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सा. ,यांच्या समोर आत्मसमर्पण केले आहे. यामध्ये ०१ पुरुष आणि ०१ महीला नक्षलवादयाचा समावेश आहे.

१) **जतिन उर्फ भाऊजी तुमरेटी** हा २४ वर्ष वयाचा जहाल माओवादी असुन माहे जुन २०१६ मध्ये चातगाव दलमच्या सदस्य पदावर भरती होवुन २०१७ ते २०१९ पर्यंत डीव्हिसी सुकलालचा बॉडीगार्ड म्हणुन काम करत होता. त्यानंतर एप्रिल २०२० पर्यंत तो चातगाव दलममध्ये सदस्य पदावर कार्यरत होता. त्याचेवर चकमकीचे १० गुन्हे , खुनाचे ०२ गुन्हे **दाखल असुन शासनाने त्याचेवर एकुण ०४ लाख ५० हजार रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

२) **रंजना उर्फ ज्योती दोगे मड्डामी** ही १८ वर्ष वयाची माओवादी असुन ती माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये गट्टा दलम मध्ये सदस्य म्हणुन भरती होवुन एप्रिल २०२० पर्यंत गटटा दलमच्या सदस्यपदी कार्यरत होती. तिचे**वर चकमकीचे ०४ गुन्हे दाखल असुन, तिच्यावर शासनाने ०४ लाख ५० हजार रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

गडचिरोली पोलीस दलाने सातत्यपुर्ण यशस्वी नक्षलविरोधी अभियान राबविल्यामुळे तसेच गेल्या दोन वर्षापासुन नागरी कृती शाखेमार्फत गडचिरोली पोलीसांनी जिल्हाभरात आदिवासी बांधवांकरीता घेतलेले जनजागरण मेळावे, शांती मेळावे, ग्रामभेटी तसेच जे तरुण तरुणी नक्षलमध्ये भरती झाले आहेत, त्यांच्या घरी पोलीसांनी जावुन त्यांना सुखी जीवनाचे महत्व पटवुन सांगितल्याने व नक्षल नातेवाईकांसाठी दिलेली मदत व आयोजित केलेल्या सहली यामुळे त्यांच्या मनात पोलीस दलावर निर्माण झालेला विश्वास याचा परीपाक म्हणुन आज या ०२ जहाल माओवाद्यांनी हे आत्मसमर्पण केले आहे.

आदिवासी भागातील जनतेकडून नक्षलवादयांना मिळणारा अल्प प्रतिसाद, नक्षलवादी आदिवासी लहान मुले- मुली यांचा छळ करत त्यांचा नक्षली कारवायांसाठी करुन घेत असलेला वापर, वरीष्ठ नक्षलवादी आपल्या कुटूंबासह राहत असतांना आम्ही मात्र वर्षानुवर्षे आपल्या आप्तस्वकीयांपासुन लांब राहत असल्याची खंत मनात नेहमी असते. आपल्या कुटूंबांसोबत राहण्यासाठी आपण या नरक जीवनाला कंटाळुन सुखी जीवनाची कास धरण्यासाठी आत्मसमर्पण करत असल्याचे आत्मसमर्पीत माओवादयांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी दलममधील इतर माओवादी यांनी देखील हिंसाचाराचा मार्ग सोडून आपणच आपल्या आदिवासी बांधवांवर करत असलेले अनन्वित अत्याचार थांबवुन आपल्या भागाचा देखील इतर उन्नत समाजाप्रमाणे

विकास व्हावा. या दृष्टीने विकासाच्या मुळ प्रवाहात येण्यासाठी आत्मसमर्पण योजनेचा फायदा घेत विकासाच्या मुळ प्रवाहात यावे याबद्दल आवाहन केले.

गडचिरोली पोलीस दलाने अतिशय प्रभावीपणे नक्षलविरोधी अभियान राबविल्यामुळे सन २०१९-२० सालामध्ये आजपर्यंत एकुण ३५ माओवादयांनी आत्मसमर्पण केले असुन, यात ०४ डिव्हीसी, ०२ दलम कमांडर, ०२ दलम उपकमांडर, २६ सदस्य, ०१ जनमिलीशिया यांचा समावेश आहे.

विकास कामांना आडकाठी निर्माण करणाऱ्या नक्षलवाद्यांवर पोलीस दल सक्षमपणे कारवाई करण्यास तत्पर असुन जे माओवादी विकासाच्या प्रवाहात सामील होण्यास इच्छुक असतील त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच लोकशाहीतील सन्मानाचे जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल. असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सो. यांनी केले आहे.

